# नवा प्रयोग

साने गुरुजी


रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

B72

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**नवा प्रयोग : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये १००/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# नवा प्रयोग

'नवा प्रयोग' ही साने गुरुजींनी लिहिलेली अखेरची कादंबरी. थोर लेखकांचे सर्वच लिखाण हे एका वेगळ्या पातळीवरचे आत्मकथन असते. एका अर्थाने ते त्यांचे अखेरचे आत्मनिवेदनही आहे. आपले सर्वस्व ओतूनच ते आपले लिखाण करीत असत.त्यांच्या लिखाणातून त्यांचे त्या त्या काळातले मनोगत जाणून घेता येते.

नव-भारताच्या घडणीचा एक आराखडाच या कादंबरीत प्रस्तुत झाला आहे.

आपल्या निरोपाच्या पत्रात त्यांनी म्हटले आहे,''लोकशाही समाजवाद हे ध्येय धरा. ते तारील.अजातीय व अहिंसक लोकशाही व सत्याग्रही दृष्टी घ्या. भारतात रक्तपात न होता समाजवाद येवो. व्यक्तिस्वातंत्र्यासह समाजवाद फुलो.''

असा हा नव-भारत निर्माण व्हावा असा एकच एक ध्यास त्यांना होता. त्यासाठी प्रबोधन, रचना आणि संघर्ष ही त्रिसूत्री आपल्याला स्वीकारणे आवश्यक आहे.

प्रबोधनावाचून होणारी रचना ही आंधळी आणि रचनेवाचून होणारे प्रबोधन वांझ ठरते.

संघर्षाची तयारी ठेवल्यावाचून विकासोन्मुख देशात रचना करणेदेखील शक्य होत नाही.

चांगले बोलायला कोणाचेच काही जात नाही, पण ते चांगले करायचे म्हटले म्हणजे ज्यांच्या हितसंबंधांना बाधा पोहोचते त्यांचा विरोध पत्करण्यावाचून गत्यंतरच

राहात नाही. संघर्ष ही देखील विकासोन्मुख देशात प्रबोधनाची एक प्रखर अशी प्रक्रियाच बनते.

प्रबोधन, रचना आणि संघर्ष ही समाजपरिवर्तनाची एकच प्रक्रिया असते. सोईसाठी वेगवेगळ्या शब्दांचा प्रयोग करायचा, इतकेच.

'नवा प्रयोग'या कादंबरीत साने गुरुजींनी ललितमनोहर पद्धतीने हेच सांगितले आहे. असे नवे प्रयोग ठायी ठायी धडपडणाऱ्या मुलांनी करावे ही त्यांना तळमळ होती.

सेवा दलाच्या सांगली शिबिरात त्यांनी हेच सर्वांना सांगितले. सेवा दल सैनिकांशी झालेले तेच त्यांचे बहुधा अखेरचे हितगूज असावे.

✦✦

# जा, घना जा !

भगभग करीत आगगाडी स्टेशनात आली. संदरपूरचे स्टेशन तसे फार मोठे नव्हते. परंतु स्टेशनात नेहमी गर्दी असायची. आज पुन्हा तिकडे दसगावचा आठवड्याचा बाजार होता.याच गाडीने लहानमोठे व्यापारी दसगावला जायचे. इतरही माणसे जायची. म्हणून स्टेशनात आज रोजच्यापेक्षा अधिक गर्दी होती. केळी, संत्री, चिवडा वगैरे विकणाऱ्यांची गर्दी होती. वर्तमानपत्रे, मासिके वगैरे विकणारेही दिसत होते. चहाच्या दुकानाजवळ पुष्कळ मंडळी होती. गाडी येताच धावपळ सुरू झाली. चहा हिंदू, चहा मुसलमान वगैरे आवाज कानावर येऊ लागले. हमाल मजुरी शोधू लागले. कोणाचे सामान आहे का बघत होते. स्टेशनच्या बाहेरून टांगेवाले स्वारी आहे का, स्वारी आहे का – विचारीत होते.

अशा त्या गर्दीत ती पाहा एक विचित्र व्यक्ती दिसत आहे. आगगाडीतूनच ती उतरली. नेसू एक खादीचा पंचा नि अंगात खादीची कोपरी. डोक्यावर टोपी नव्हती. हातात एक पिशवी होती. खांद्यावर घोंगडी होती. उंच, सडपातळ व्यक्ती, डोळ्यांना चष्मा होता. तोंडावर एक प्रकारची उत्कटता आहे. ओठांवर मंद स्मित आहे. त्या गर्दीत ती तरुण मूर्ती उभी राहिली. चोहोबाजूंना तिने

पाहिले. नंतर गर्दीतून वाट काढीत ती तिकीट देण्याच्या फाटकाजवळ आली. तिकीट देऊन ती बाहेर आली.

''स्वामी, टांगा पहिजे का, स्वामी?''

''अहो महाराज, कोठे जायचे? संस्कृतीत जायचे का?''

''या इकडे या. मठात जायचे का महाराज?'' टांगेवाले तरुणाभोवती गर्दी करू लागले.

''मला नको टांगा.'' तो तरुण म्हणाला.थोडा वेळ सारे शांत झाल्यावर त्याने तेथील एका गृहस्थाला विचारले, '' भारतीय संस्कृती मंदिर येथे कोठेसे आहे?''

''या बाजूने जा. नंतर डाव्या बाजूने वळा. पुढे नदी आहे. नदीकाठीच ती इमारत आहे. दिसेलच तुम्हाला. तुम्हाला येताना आगगाडीतून दिसली नाही संस्था?''

''गाडीत अतोनात गर्दी. कसातरी उभा होतो.अच्छा, नमस्ते !'' असे म्हणून तो तरुण झपाट्याने पावले टाकीत निघून गेला.

ती पाहा नदी आणि तिच्या तीरावर ते भारतीय संस्कृती मंदिर.

तो तरुण संस्थेच्या फाटकाजवळ आला. बाहेर मोठी पाटी होती. तो तरुण आत शिरला. आत शिरताच सुंदर फुलबाग होती. दोन्ही बाजूंना कारंजी होती. मधून उंच झाडे होती. तो तरुण पुढे गेला, एका बाजूला त्याला 'व्यवस्थापकांची कचेरी' अशी पाटी दिसली. तो तेथे गेला. कचेरीत एक गृहस्थ होते; तेच व्यवस्थापक असावेत.

''नमस्ते !'' तो तरुण म्हणाला.

'' नमस्ते, बसा.'' ते व्यवस्थापक म्हणाले.

'' मी आलो आहे. आपल्या संस्थेत मी अर्ज केला होता. मला सर्व संस्कृतींचा अभ्यास करायचा आहे. घ्याल का संस्थेत, म्हणून विचारले होते. येथून होकारार्थी उत्तर आले होते. हे पाहा येथले पत्र.'' असे म्हणून संस्थेचे पत्र त्याने दाखवले.

''आपणच का सखाराम ?''

''हो, मीच.''

'' ठीक. तुम्हाला महिना ३० रुपये मिळतील.येथे अभ्यास करा, वाचा; केवळ जगण्यापुरती शिष्यवृत्ती तुम्हाला देण्यात येईल.''

''मला अधिकाची जरूर नाही.''



''चला तुमची खोली तुम्हाला दाखवतो.''

सखारामला त्याची खोली दाखवण्यात आली.

ते व्यवस्थापक निघून गेले. संस्थेतील काही विद्यार्थी, काही प्राध्यापक त्यांच्या भोवती जमले. थोडेफार बोलणे झाले.

'' येथे क्लब आहे, त्याच्यात जेवायला या आणि माझी बादली घ्या.तिकडे हौद आहे. तेथे आंघोळीची व्यवस्था आहे.'' एक तरुण म्हणाला.

'' तुमचे नाव काय?'' सखारामने विचारले.

''मला सारे घना म्हणतात. घनश्याम माझे नाव. तुमचे नाव?''

'' सखाराम.''

'' छान नाव ! सर्वांचा सखा होणारा राम, सर्वांचा मित्र होणारा राम. मला सखाराम नाव लहानपणापासून आवडते. तुम्ही दमून आला असाल. मी बादली आणून देतो. स्नान करून विश्रांती घ्या. जेवायला अवकाश आहे. आज सुट्टी आहे.''

'' आज कसली सुट्टी ?''

'' ही संस्था ज्यांच्या प्रेरणेमुळे स्थापण्यात आली त्यांची आज पुण्यतिथी.''

घना आपल्या खोलीत गेला. त्याने बादली आणून दिली. सखारामला त्याने संडास, हौद सारे दाखविले.

''तुम्ही आता जा. मी सारे आटपून येतो. तुम्ही जणू जुने मित्रच भेटलात.'' सखाराम मधुर हास्य करीत म्हणाला.

घना निघून गेला.सखाराम कितीतरी वेळ स्नान करीत होता. तो लांबून आला होता. दोन दिवसांत आंघोळ नव्हती. त्याने आपले कपडे धुतले आणि मग खोलीत आला. पिशवीतून दोरी काढून त्याने बांधली. तिच्यावर आपले कपडे त्याने वाळत टाकले. खोलीत एक टेबल होते. टेबलावर त्याने आपली दोन-चार पुस्तके ठेवली.एक तुकारामाची गाथा होती. उपनिषदांचे पुस्तक होते. रवींद्रनाथांची साधना आणि गीतांजली ही दोन पुस्तके होती. आश्रम भजनावली आणि गीता ही छोटी पुस्तके होती. श्रीरामकृष्ण परमहंसांची एक तसबीर होती. ती त्याने टेबलावर मध्यभागी ठेवली. नंतर तो बागेत गेला. त्याने दोन फुले आणून त्या तसबिरीला वाहिली. नंतर घोंगडी पसरून तिच्यावर पडला. थोड्या वेळाने त्याचा डोळा लागला.

घनाने येऊन पाहिले तो सखारामला झोप लागलेली. तो तेथील खुर्चीवर बसला. ती पुस्तके तो चाळीत होता. साधना वाचताना तो रमून गेला. इतक्यात जेवणाची घंटा झाली. सखारामला जाग आली.

'' चला जेवायला.''

'' चला.'' सखाराम म्हणाला.

तेथे दहा-बारा जण जेवायला असत.एक आचारी होता. इतर कामं करायला एक वृद्ध गडी होता. त्याचे नाव गणा. गणाचा एक मुलगा गिरणीत कामाला जाई. लहान दहा वर्षांचा रुपल्या अजून कामाला नसे जात. म्हाताऱ्या गणाचा रुपल्यावर फार जीव. रुपल्याही त्या क्लबचेच काम करी. उरले-सुरले अन्न गणा नि रुपल्या यांना पुरे.

'' बसा सखाराम.'' घना म्हणाला.

दोघे शेवटी जवळ जवळ जेवायला बसले. त्या जेवणाऱ्या मंडळींत कोणी बंगाली होते, कोणी गुजराती होते, एक तामिळ होता, काही महाराष्ट्रीय होते, एक कन्नड बंधूही होता. जणू ते भारतीय संमेलन होते !

''नूतन बंधूर नाम की !'' बंगाली बाबूने विचारले.

''नामटी एकटु सखाराम.'' सखाराम हसत म्हणाला.

''बंगाली जानते पोरा?''

''किछु किछु !''

सर्वांना हसू आले. सखारामला एकदम ठसका लागला. त्याला का अळसुद गेले?

'' पाणी प्या,पाणी प्या''.कोणी म्हणाले.

'' तन्नी कुडी.'' तामिळ मित्र म्हणाला.

'' कुडच्याची.'' पाणी पिऊन सखाराम म्हणाला.

''आप तो हर एक प्रान्तकी भाषा जानते हैं ऐसे मालूम पडता है।'' एक उत्तर भारतीय म्हणाले.

''मैं तो भारत का यात्री. आज इतने दिन घूमता हूँ । आल्मोडासे कन्याकुमारी तक घूमा । आज यहाँ आया हूँ । मैं शान्तिसमाधान ढूँढता हूँ।'' सखाराम म्हणाला.



''समाधान बाहर कहीं नहीं मिलता, समाधान मनका एक धर्म है, मनकी वृत्ती है। विवेकबुद्धीसे समाधान मिलता है। इधर उधर मिलनेवाली यह चीज नहीं है।''

'' तो भी स्थानमाहात्म्यका असर होता है। सत्संगका परिणाम होता है। वह मैं देखूंगा।'' सखाराम म्हणाला.

जेवणे झाली.सखाराम आपल्या खोलीत गेला. ''तुम्हाला लवंग हवी ?'' घनाने येऊन विचारले.

'' नको.''

'' तुम्ही झोपा.जागरण झाले असेल. तुम्ही कोठून आलात ?''

'' मद्रासकडून .''

'' प्रवासाचा खूप शीण आला असेल. दुपारून सभा आहे. मी उठवीन.''

'' ही संस्था सुंदरदासांनी स्थापली ना?''

'' परंतु त्यांना प्रेरणा देणारे एक साधे सज्जन होते. त्यांचे नाव रामजी मास्तर. रामजी मास्तर मोठे वेदांती होते. उत्कृष्ट सतार वाजविणारेही. सुंदरदासांना लहानपणी ते घरी शिकवायला जात आणि सुंदरदासांना पुढे त्यांनी अध्यात्माची गोडी लावली. संस्कृतीचा, धर्माचा, तत्त्वज्ञानाचा अभ्यास व्हावा म्हणून ही संस्था काढायला त्यांनी सांगितले. येथे पूर्वी विद्यार्थी घेतले जात. अलीकडे ती प्रथा कमी झाली आहे. आता एम्.ए. वगैरे झालेले फेलो म्हणून येथे घेतात. ते अभ्यास करतात.चर्चा करतात. सुंदरदासही चर्चेत भाग घ्यायला येतात. ते अध्यात्मवादी आहेत; परंतु त्यांचे अध्यात्म मला तितके रुचत नाही ! ''

'' मी हिंदुस्थानभर भटकत येथे आलो. येथे तरी किती दिवस राहतो, हरी जाणे!''

'' तुम्ही जरा पडा. मी जातो .''

घना निघून गेला. सखाराम पडून राहिला. तो विचारात होता. घनाबद्दल त्याला प्रेम वाटू लागले. याच्यासाठी का मी येथे आलो? आपल्या जीवनाचे धागेदोरे कसे विणले जातात, काही कळत नाही; या विचारांत तो झोपी गेला.

तिसऱ्या प्रहरी संस्थेच्या सभागृहात रामजी मास्तर यांच्या पुण्यतिथीनिमित्त सभा होती.रामजी मास्तरांच्या तैलचित्राला हार घालण्यात आले. सुंदरदासशेठ

आले होते. ते म्हणाले, ''रामजी मास्तरांचा माझ्या जीवनावर कायमचा ठसा उठला आहे. जे काम हाती घ्यावे ते नीट पार पाडावे ही गोष्ट त्यांनी मला शिकवली. लहानपणी एक शब्द मला नीट लिहिता येईना. त्यांनी तो मला पंचवीस वेळा लिहायला लावला. परंतु त्यांचा सर्वात मोठा उपकार म्हणजे वेदांताची त्यांनी मला गोडी लावली. जगातील इतर सर्व तत्त्वज्ञानापेक्षा वेदांत श्रेष्ठ आहे, असे ते म्हणत.त्यांच्याच स्फूर्तीने ही संस्था स्थापण्यात आली. विवेकानंदांसारखे महात्मे या संस्थेने जगास द्यावे असे त्यांना वाटे. ते नि:स्पृह होते. मी एकदा त्यांना म्हटले, 'आज वाटेल ते माझ्याजवळ मागा. मी देतो.' ते म्हणाले, 'दोन मुलगे आहेत; दहा एकर जमीन द्या. खपतील आणि खातील.' त्या दिवशी ते लाख रुपये मागते तरी ते मी दिले असते. परंतु ते अकिंचन वृत्तीचे होते. मरताना म्हणाले, देह सुटला राम ! जणू आत्म्याला चिकटलेले बंधन तुटले.या संस्थेत तुम्ही आहात.तुम्ही सर्व धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञाने यांचा अभ्यास करा; परंतु आपल्या संस्कृतीत ज्या अद्वैताचा सुगंध भरला आहे, ते अद्वैत तत्त्वज्ञान सर्वत्र न्या.त्याचा जयजयकार करा.''

सुंदरदास यांचे असे भाषण झाले.आणखी काहींची झाली. सभा संपली.

सुंदरदासांनी सखारामची चौकशी केली.

''तुमच्यासारखे तपस्वी तर या संस्थेला हवे आहेत. राहा येथे. अभ्यास करा. तुम्हास समाधान मिळो.'' सुंदरदास म्हणाले.

''तुम्हाला समाधान आहे का?'' सखारामने प्रश्न केला.

''ते काय सांगू ?''

''तुम्हाला सर्वांभूती समाधान वाटते का?''

''माझे अध्ययन निराळे आहे. आपण काहीही केले तरी त्यापासून आपला आत्मा निराळा आहे ही जाणीव अंतरंगी जागृत ठेवणे याला मी वेदांत समजतो. कर्माने आत्मा मळत नाही. ते कर्म सत्कर्म असो व दुष्कर्म असो; आत्मा सत् आणि असत् यांच्या पलीकडे आहे.''

''हे भयंकर तत्त्वज्ञान आहे ! साधुसंतांची साधना का फोल? अद्वैताचा ज्यांनी अनुभव घेतला ते वाटेल तसे नव्हते वागत. त्यांच्या जीवनावरून जर वेदांत समजून घ्यायचा असेल तर तुम्ही म्हणता त्याचा मेळ कसा घालायचा? शंकराचार्यांच्या



भाष्याच्या आरंभीच मुळी म्हटले आहे की, शम, दम वगैरे सद्गुण अंगी असल्याशिवाय कोठला वेदांत? कोठले अद्वैत?''

''तुम्ही अजून या क्षेत्रात बाळ आहात.''

''मला बाळच राहू दे.'' असे म्हणून प्रणाम करून सखाराम निघून गेला.

संस्थेच्या प्रमुखांना सुंदरदास म्हणाले, ''हा तरुण निराळ्या वृत्तीचा दिसतो. हा केवळ चर्चाराम दिसत नाही !''

त्या दिवशी सखाराम आणि घना दूर फिरायला गेले होते. नदीच्या मध्यभागी असलेल्या एका खडकावर दोघे मित्र बसले होते. नदीचे शंखासारखे पाणी खळखळ करीत जात होते. तो शरद ऋतू होता. सायंकाळचा कोवळा गंभीर प्रकाश नदीच्या पाण्याजवळ खेळत होता. सूर्याचे किरण सायंस्नान आटोपून जणू पटपट जात होते.

''घना, चोहोबाजूंना पाणी असून मध्ये हा खडक आहे, त्याप्रमाणे जीवनात सर्वत्र निंदा-स्तुती, स्पर्धा, मानापमान यांचे वेगवान प्रवाह वाहात असतानाही आपल्याजवळ असा एखादा भक्कम आधार हवा, जेथे आपण या सर्व गोष्टींपासून सुरक्षित असू; तेथे आपण परम शांती अनुभवू शकू.'' सखाराम म्हणाला.

''असा आधार म्हणजे सर्व चराचराशी एकता अनुभवणे, दुजेपणाची वार्ताही नसणे, आपणास आपले मन क्षणभर तरी या सर्व पसाऱ्यापासून अलिप्त करता आले पाहिजे आणि सर्व विश्वाशी मूलभूत ऐक्य अनुभवता आले पाहिजे.'' घना म्हणाला.

''परंतु हे आंतरिक ऐक्य अनुभवणे सोपे नाही. बाह्य जीवनातही त्याची अनुभूती हवी. मी माझ्या खोलीत गणाला झोप म्हटले तर ते दुसरे पंडित हसले. पाऊस पडत होता. गणाची झोपडी गळत होती. म्हणून मी त्याला म्हटले, ये माझ्या खोलीत झोप. त्या रुपल्याला मी शिकवतो, तर त्यांना बघवत नाही! रुपल्या माझ्या खाटेवर चित्रांचे पुस्तक पाहात बसला तर त्यांना ते कसेतरीच वाटते.''

''कॉलेजमधून एम्. ए. वगैरे होऊन आलेली ही मंडळी; त्यांना गरिबांशी समरस होणे अजून माहीत नाही. ''